लोकमत




# प्रतिभा महाविद्यालयाच्या सायबर क्लबला मिळाले उपविजेतेपद

**पिंपरी :** चिंचवड येथील प्रतिभा वाणिज्य आणि संगणक अध्ययन महाविद्यालयाच्या सायबर क्लबने सर्वोत्कृष्ट सर्वकष (ओव्हर ऑल) सायबर क्लब या गटात उपविजेतेपद पटकावले. क्विक हील फाउंडेशनच्या सायबर शिक्षणासाठी 'सायबर सुरक्षा' या उपक्रमांतर्गत हा राष्ट्रीय कार्यक्रम आयोजित केला होता. विद्यार्थी आकाश ठाकूर, स्नेहा तेली, साकीब चौधरी, श्रावणी सावंत, मानसी वाडेकर वैयक्तिक स्तरावरही यश संपादन केले. क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, महाराष्ट्र सायबरचे उपमहानिरीक्षक संजय शिंत्रे यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण झाले. संकुलांचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शाह, प्राचार्या क्षितिज गांधी, शिक्षक डॉ. हर्षिता वाच्छानी उपस्थित होते. खजिनदार डॉ. भूपाली शहा, संचालिका डॉ. तेजल शहा, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया, आदींनी शुभेच्छा दिल्या.